आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२८ नोव्हेंबर २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- जागतिक विचारमंथनाला दिशा देण्याचं काम आजचा भारत करत असल्याचं संरक्षण मंत्र्यांचं प्रतिपादन

- जागतिक शक्ति निर्देशांकावर आधारित क्रमावारीत भारत तिसऱ्या स्थानी

- महाराष्ट्रात ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत, तिथं ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण ठेवू नये असे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

**आणि**

- दितवा चक्रीवादळामुळे देशाच्या पूर्व किनारपट्टी भागात १ डिसेंबरपर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज

**<><><><><>**

जागतिक विचारमंथनाला दिशा देण्याचं काम आजचा भारत करत असून हिंद प्रशांत आणि ग्लोबल साऊथमधले देश एक विश्वासू भागीदार म्हणून भारताकडे पाहतात, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितलं. नवी दिल्लीत आयोजित यंदाच्या चाणक्य संरक्षण परिसंवादात ते आज बोलत होते. विस्तारत जाणारी आपली अर्थव्यवस्था, अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रगती आणि तत्वनिष्ठ राजनैतिकतेसाठी दृढ वचनबद्धता यांनी आपल्याला समतोल, स्थिर आणि जबाब्दारीपूर्ण आवाज मिळवून दिला आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं.

भारतानं नेहमीच शांतता आणि परस्पर संवादावर विश्वास ठेवला आहे, मात्र जेव्हा देशाच्या स्वायत्ततेचा आणि नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न उभा ठाकतो तेव्हा कोणतीही तडजोड केली जात नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**--- होल़्ड - बाईट - राजनाथ सिंह - - -**

सुरक्षित भारताशिवाय विकसित भारत अशक्य आहे आणि सशक्त भारताशिवाय सुरक्षित भारत अशक्य असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज कर्नाटक आणि गोवा दौऱ्यावर आहेत. कर्नाटकात उडुपी इथल्या श्रीकृष्ण मठाला त्यांनी भेट दिली आणि पूजा अर्चना केली. गर्भगृहासमोरच्या सुवर्ण तीर्थ मंडपाचं उद्धाटन करुन नंतर त्यांनी संत कनकदास यांच्या  पवित्र खिडकीला सुवर्ण कवच अर्पण केलं. या खिडकीतून कनकदासांना भगवान कृष्णांचं दर्शन झालं होतं असं मानलं जातं. त्यानंतर आयोजित लक्ष कंठ गीता पठण कार्यक्रमात प्रधानमंत्री सहभागी झाले.

प्रधानमंत्री नंतर  गोव्याला जाणार असून  पर्तगळी इथं प्रभू श्री रामांच्या  ७७ फूट उंच कांस्य पुतळ्याचं अनावरण करणार आहेत. याच ठिकाणी त्यांच्या हस्ते १० हजार चौरस फूट संग्रहालयाचं उद्धाटन होईल.

**<><><><><>**

आत्मनिर्भर भारत हे आता एक सामूहिक राष्ट्रीय अभियान बनलं असून प्रत्येक भारतीय आपापल्या पद्धतीने त्यात योगदान देत असल्याचं प्रतिपादन वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत FICCIच्या ९८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला संबोधित करत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारतात आर्थिक स्वावलंबनाची धारणा रुजवल्याचंही गोयल म्हणाले. फिक्कीच्या यंदाच्या सभेची संकल्पना देखील महात्मा गांधीच्या आर्थिक स्वावलंबनाच्या दृष्टिकोनाशी सुसंगत असल्याचं गोयल म्हणाले..

**-   - होल्ड बाईट - पियूष गोयल - -**

परकीय व्यापार गुंतवणुकीने व्यवसायांची व्याप्ती आणि आर्थिक उलाढाल वाढवण्यासाठी मदत केली आहे. देशातलं संशोधन, विकास आणि नवोन्मेष क्षेत्र वेगाने वाढत असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

छत्तीसगडमधे नवा रायपूर इथे आजपासून पोलीस महासंचालक आणि महानिरीक्षकांची साठावी अखिल भारतीय परिषद सुरू झाली. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा सहभागी होत आहेत. तर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या या परिषदेत सहभागी होतील. या परिषदेत प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पोलिसांना राष्ट्रपती पदकांचं वितरण होणार आहे. या परिषदेचा उद्देश पोलिसांसमोरच्या प्रमुख आव्हानांना सामोरं जाताना झालेल्या प्रगतीचा आढावा घेणं आणि विकसित भारतासाठी देशाची

सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने भविष्यकालीन रुपरेषा आखणं हा आहे. विकसित भारत - सुरक्षेच महत्त्व ही यंदाच्या परिषदेची संकल्पना आहे. या परिषदेत दहशतवाद, आपत्ती व्यवस्थापन, महिला सुरक्षा, न्यायवैद्यक शास्त्र आणि कृत्रिम बुद्धमत्ता या विषयांवर तपशीलवार चर्चा होईल. देशभरातले वरिष्ठ पोलीस अधिकारी, विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे पोलीस महासंचालक तसंच, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल हे देखील या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

<><><><>

प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी येत्या रविवारी सकाळी ११ वाजता आकाशवाणीवर मन की बात कार्यक्रमाच्या १२८ व्या भागात देश-विदेशातल्या श्रोत्यांशी संवाद साधतील. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्क, वेबसाइट तसंच न्यूज़ऑनएयर मोबाइल ऐपवर प्रसारित केला जाईल.

<><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज लखनऊ दौऱ्यावर आहेत. प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्थेच्या वार्षिक समारंभाला त्या उपस्थित राहिल्या.

त्यानंतर राष्ट्रपती भारत स्काउट्स अँड गाईड्सच्या हीरक महोत्सवी समारंभाच्या समारोप सोहळ्याला उपस्थित राहून संबोधित करणार आहेत. विविध राज्यांमधून सुमारे तेहतीस हजार स्काउट्स, गाईड्स, रोव्हर्स आणि रेंजर्स आणि मालदीव, नेपाळ, श्रीलंका आणि सौदी अरेबियासह आशिया-पॅसिफिक प्रदेशातील पंधराशेहून अधिक युवा प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

<><><><>

जागतिक शक्ति निर्देशांकावर आधारित क्रमावारीत भारत तिसऱ्या स्थानावर आहे. पहिलं स्थान अमेरिकेला तर दुसरं चीनला मिळालं आहे. ऑस्ट्रेलियातल्या लोवी संस्थेमार्फत हे सर्वेक्षण करुन मानांकन दिलं जातं. राष्ट्रांचा आपापल्या खंडातला प्रभाव,आणि जगावर प्रभाव टाकण्याची क्षमता, सामरिक, राजनैतिक आणि सांस्कृतिक प्रभाव अशा १३१ निकषांवर आधारित हे मानांकन दिलं जातं.

<><><><>

महाराष्ट्रात ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत, तिथं ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षणाची अधिसूचना जारी करू नये, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज राज्य निवडणूक आयोगाला दिले. तसंच, ज्या निवडणुकांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षणाची अधिसूचना जारी झालेली आहे, त्या निवडणुकांचा निकाल या याचिकांवरच्या निकालावर अवलंबून राहील, असंही सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठानं स्पष्ट केलं. राज्यात एकंदर २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून यापैकी ४० नगरपरिषदा आणि १७ नगरपंचायतींमध्ये आरक्षणाची कमाल मर्यादा ओलांडली जात असल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाचे वकील बलबीर सिंह यांनी न्यायालयाला दिली. तर, २९ महानगरपालिका आणि ३४६ पंचायत समित्यांच्या निवडणुका अद्याप जाहीर झाला नसल्याचंही त्यांनी सांगितलं. हे प्रकरण तीन न्यायमूर्तींच्या पीठाकडे सोपवून पुढची सुनावणी २१ जानेवारी रोजी घ्यायची सूचना न्यायालयानं केली आणि ज्यांची अधिसूचना जारी झालेली आहे, त्या निवडणुका वेळापत्रकाप्रमाणे घ्यायला परवानगी दिली. याशिवाय, उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अधिसूचना जारी करायचा मार्गही सर्वोच्च न्यायालयानं मोकळा केला, मात्र या सर्व निवडणुकांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडू नका, असे निर्देशही न्यायालयानं दिले. फक्त दोन महानगरपालिकांमध्ये ही मर्यादा ओलांडली जात असल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगानं दिल्यानंतर या निवडणुकांची अधिसूचना तातडीनं जारी करावी आणि निवडणूक कार्यक्रम राबवावा, असं न्यायालयानं सांगितलं.

<><><><><>

उत्तर-पश्चिम बंगालच्या उपसागरात तयार झालेलं दितवा चक्रीवादळ तमिळनाडू, पुद्दुचेरी आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टी भागांकडे सरकत आहे. यामुळे देशाच्या पूर्व किनारपट्टी भागात १ डिसेंबरपर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. बंगालच्या उपसागराच्या आग्नेय भागांमध्ये, मनार आणि कन्याकुमारी भागात सोमवारपर्यंत मच्छीमारांनी समुद्रात जाणं टाळावं असा सल्ला देण्यात आला आहे. दक्षिणेकडील किनारी भागांमध्ये काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तमिळनाडूच्या

उत्तरेकडील भागांत पुढील तीन दिवसांत जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

श्रीलंकेत या वादळामुळे आलेल्या पुरात आणि अतिवृष्टीत किमान ५६ जणांचा मृत्यू झाला तर २१ जण अद्याप बेपत्ता आहेत. सुमारे ४४ हजार लोकसंख्येला वादळाचा फटका बसला आहे.

//<><><><><>//